**प्रेस नोट** **दिनांक ०७/०३/२०१९**

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशन,पुणे

## अवैद्य धंद्याविरुध्द कारवाई केले बाबत.

दिनांक ०५/०३/२०१९ रोजी मा.सहा.पोलीस आयुक्त, श्री.शिवाजी पवार सोा, यांना गुप्त बातमीदाराकडुन खाजीशीर बातमी मिळाली की, भिमनगर विश्रांतवाडी परिसरात तडीपार इसम नामे गुंड्या उर्फ सुरज मनोहर माचरेकर व त्यांचा भाऊ विनोद मनोहर माचरेकर हे भिमनगर भागात राहते घरात अवैद्यरित्या कल्याण व मंबई मटका नावाचा जुगार व्यवसाय चालवित आहेत. अशी बातमी मिळाल्यावरुन सदर ठिकाणी श्री.शिवाजी पवार मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा,विभाग पुणे यांनी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या टिम तयार करून मा. अप्पर पोलीस आयुक्त पुर्व विभाग श्री सुनिल फुलारी सोा यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०५/०३/२०१९ रोजी २०.४० वा सुमारास सर्वे नं ४६ भिमनगर विश्रांतवाडी पुणे येथे तडीपार इसम नामे गुंड्या उर्फ सुरज मनोहर माचरेकर यांचे रहाते घरी छापा टाकला असता गुंड्या माचरेकर व त्याचा भाऊ विनोद माचरेकर हे पोलीसांना पाहून हातीतील पैशाचे बंडल टाकून तेथून गल्ली बोळीचा व अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले त्यावेळी गुंड्या उर्फ सुरज मनोहर माचरेकर याचे घरात इसम नामे १) प्रविण कंडलिक पालेकर रा.हरीकृष्ण पार्कचे मागे धानोरी पुणे हा व सदर ठिकाणी कल्याण व मुंबई मटका नावाचे जुगाराच्या चिठ्या असा जगाराचे साहीत्य व रोख रक्कमेसह एकुण ३,७८,५८०/- रोख मिळुन आलेत.तसेच इसम नामे गुंड्या उर्फ सुरज मनोहर माचरेकर हा विश्रांतवाडी पोलीस स्टेशन व पुणे शहर हद्दीतुन तडीपार असताना कोणत्याही पुर्व परवानगी शिवाय भिमनगर भागात मिळुन आला आहे, म्हणुन त्यांचे व त्याचा भाऊ विनोद माचरेकर व प्रविण कंडलिक पालेकर,यांचे विरुध्द विश्रांतवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा.रजि. नं ७१/२०१९ महाराष्ट्र ( मंबई) जुगार अँक्ट कलम ४,५ प्रमाणे व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे कायदेशिर कारवाई केली आहे.तसेच पाहीजे आरोपी विनोद माचरेकर यांस काल दिनांक ०६/०३/२०१९ रोजी २२.०० वा अटक करण्यात आली आहे. व पाहीजे तडीपार इसम गुंड्या उर्फ सुरज मनोहर माचरेकर याचा शोध चालू आहे.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त सो/पुर्व विभाग श्री सुनिल फुलारी सोा व मा श्री.प्रसाद अक्कानवरु, पोलीस उप-आयुक्त सोा,परि.४ पुणे.यांच्या मार्गदर्शना खाली मा.सहा.पोलीस आयुक्त, श्री.शिवाजी पवार सोा, येरवडा पुणे यांनी विभागातील अधिकारी सपोनि बोबडे व स्टाफ येरवडा पो.स्टे ,पो.उपनिरीक्षक भोसले व स्टाफ चंदननगर पो.स्टे, पो.उपनिरीक्षक पाटील, स्टाफ विमानतळ यांचे मदतीने केली आहे.